24 JAN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
[शि]वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ स्पर्धेत पारंपरिक कुस्तीचा समावेश करावा

## शाहू छत्रपती : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेस सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराजांच्या प्रोत्साहनामुळे कुस्तीचा देशभरात प्रसार झाला. जागतिक कीर्तीचे मल्ल कोल्हापूरच्या मातीत घडले. बदलत्या काळानुसार मॅटवरील कुस्ती ठीक आहे; पण पारंपरिक कुस्ती जपण्याची जबाबदारीही उचलली पाहिजे. त्यासाठी अ.भा. विद्यापीठ महासंघाने पारंपरिक कुस्तीचा समावेश आपल्या क्रीडा कार्यक्रमात करावा, असे प्रतिपादन शाहू छत्रपती यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून आयोजित केलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री-स्टाइल व ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्रमुख उपस्थितीत हिंदकेसरी दीनानाथ सिंह होते.

शाहू छत्रपती म्हणाले, देशभरातील मल्लांसाठी कोल्हापूर ही कुस्तीची प्रेरणाभूमी ठरली. तालमीतील सराव, मातीतील कुस्ती या भूमीत जपली जाते. पारंपरिक कुस्ती जपण्याची जबाबदारीही आपण उचलली पाहिजे. त्यासाठी भारतीय विद्यापीठ महासंघाने त्यांच्या क्रीडा कार्यक्रमात पारंपरिक कुस्तीचा समावेश करावा.

हिंदकेसरी दीनानाथ सिंह म्हणाले, खेळ विद्यार्थ्याला नोकरीपासून सर्व काही मिळवून देण्यास सक्षम आहे. त्यामुळे कुस्तीपटूंनी दर्जेदार खेळ आणि जीवन या दोहोंची तितक्याच उत्तम पद्धतीने सांगड घालून या क्षेत्राची सेवा करावी.

एआययूचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांनी शिवाजी विद्यापीठात सन २००७ मध्ये झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेची आठवण जागविली. त्यावेळी स्पर्धा पारदर्शकतेने कशी घ्यावी, याचा मानदंड या विद्यापीठाने प्रस्थापित केल्याचा आवर्जून उल्लेख केला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शाहू छत्रपती यांच्या पारंपरिक कुस्तीच्या समावेशाबाबत डॉ. मलिक यांच्याकडे विनंती केली आहे. यानिमित्त त्यांनी विद्यापीठाच्या गौरवशाली क्रीडा परंपरेचा उल्लेख केला. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या आंतरविद्यापीठ स्पर्धेतील उद्घाटनाची मल्ल अमन व जितेंद्र यादव यांच्यातील कुस्ती शाहू छत्रपती यांच्या हस्ते सोमवारी लावली. यावेळी डावीकडून डॉ. शरद बनसोडे, डॉ. सुरेशकुमार, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, हिंदकेसरी दीनानाथसिंह आदी उपस्थित होते.

### शाहू छत्रपतींच्या हस्ते उद्घाटनाची लढत

नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा मल्ल साहिल आर. आणि कुरुक्षेत्र विद्यापीठाचा मल्ल आशिष जगपाल यांच्यात ९७ किलो वजनी गटातील कुस्ती शाहू छत्रपती यांच्या हस्ते लावण्यात आली. ही कुस्ती आशिषने १२-०२ असा गुणांवर जिंकला.

24 JAN 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ स्पर्धेत मॅटप्रमाणेच मातीतील कुस्त्यांचा समावेश करावा

## शाहू महाराज : दुसऱ्या दिवशी चार वजनी गटात रंगले ४६२ सामने

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील कुस्ती स्पर्धांत मॅटवरील कुस्तीच्या बरोबरीने पारंपरिक मातीतील कुस्तीचाही समावेश करावा, अशी सूचना शाहू महाराज यांनी केली. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती (पुरुष) स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात सोमवारी त्यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी (सोमवार) चार विविध वजनी गटांत एकूण ४६२ सामने रंगले.

राजमाता जिजाऊ सभागृहात अ. भा. आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती (पुरुष) स्पर्धांचे उद्घाटन शाहू महाराज यांच्या हस्ते आणि हिंदकेसरी दीनानाथसिंह व एआययूचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. उद्घाटनाप्रसंगी शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा मल्ल साहिल आर. विरुद्ध कुरुक्षेत्र विद्यापीठाचा मल्ल आशिष जगपाल यांच्यात ९७ किलो वजनी गटाची कुस्ती लावण्यात आली. या कुस्तीत आशिषने १२-२ अशा गुणफरकाने एकतर्फी विजय मिळविला. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भारतीय विद्यापीठ महासंघाने पारंपरिक कुस्तीचा एआययूच्या क्रीडा स्पर्धांत समावेश करण्याबाबत विचार करण्याची विनंती केली.



कोल्हापूर : अ.भा. आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती (पुरुष) स्पर्धांचे उद्घाटन शाहू महाराज यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी हिंदकेसरी दीनानाथसिंह, डॉ. सुरेशकुमार मलिक आदी उपस्थित होते.

### जुन्या-नव्या मल्लांचा सत्कार

यावेळी महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक उत्तमराव पाटील, हिंदकेसरी विनोद चौगुले, बाबासाहेब शिरगावकर, रंगराव हर्णे, महाराष्ट्र केसरी नामदेव मोळे, साईचे प्रशिक्षक चंद्रकांत चव्हाण, उपमहाराष्ट्र केसरी अशोक माने, संभाजी वरुटे, राम सारंग, अक्षय डेळेकर, बंकट यादव, नवनाथ ढमाल, रोहिदास कांबळे, संभाजी पाटील आणि दिलीप पवार यांचा सत्कार शाहू महाराज यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश कांबळे आणि डॉ. अभिजित वणिरे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

24 JAN 2020
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुस्तीपंढरीत पैलवानांची मांदियाळी

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा | देशभरातील २५६० मल्ल कोल्हापूरमध्ये


**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

**शिवाजी विद्यापीठात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती (पुरुष) स्पर्धांना रविवारपासून सुरुवात झाली. या स्पर्धेसाठी देशभरातील १९५ विद्यापीठांतील २ हजार ५६० पैलवान सहभागी झाले आहेत. त्यामुळे कुस्तीपंढरी असलेल्या कोल्हापूरमध्ये देशभरातील नामांकित मल्लांची मांदियाळी जमली आहे.**

राजर्षी शाहू महाराज यांच्या आश्रयामुळे कोल्हापूरमध्ये कुस्ती रुजली व वाढली. जगभरातील नामांकित मल्ल संस्थानकाळापासून सराव तसेच कुस्ती स्पर्धांसाठी कोल्हापूरमध्ये येत असतात. सध्याही येथील तालमींमध्ये देशभरातील मल्ल घाम गाळत आहेत, तर विविध स्पर्धांमध्येही सहभागी होत असतात.

या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाकडे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धांचे यजमानपद आहे. त्याचे नेटके नियोजन जिल्हा तालीम संघाच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठाने केले आहे. ही स्पर्धा २२ ते २९ जानेवारी या कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये घेतली जात आहे. स्पर्धेसाठी देशभरातून कोल्हापूरमध्ये दाखल झालेल्या पैलवानांमुळे कुस्तीचा माहोल तयार झाला आहे.

नामांकित मल्लांच्या कुस्ती पाहण्यासाठी कुस्तीप्रेमी शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये गर्दी करत आहेत. स्पर्धेमध्ये उत्तर भारतातील मल्ल सहभागी आहेत. त्यापैकी नामांकित मल्लांच्या खेळातून स्थानिक नवोदित मल्ल कुस्तीचे धडे घेत आहेत.



### कोल्हापूरमधून प्रेरणा मिळते ...

कुस्तीला सुरुवात केल्यापासून कोल्हापूरबद्दल ऐकत आहे. यापूर्वीही कोल्हापूरमध्ये येऊन कुस्ती खेळली आहे. उत्तर भारत व येथील कुस्तीमध्ये बरेचसे साम्य आहे. कोल्हापूरला कुस्तीचा मोठा वारसा आहे. येथे आल्याने खेळण्याची प्रेरणा मिळते.

**– आशीष हुडा, आंतराष्ट्रीय मल्ल, कुरुक्षेत्र विद्यापीठ**

### दररोजच्या ५०० कुस्त्यांचे नेटके नियोजन

मोठ्या संख्येने पैलवान या स्पर्धेसाठी दाखल झाले आहेत. यामध्ये फ्री स्टाईल कुस्ती २२ ते २४, तर ग्रीको रोमन प्रकारातील कुस्ती स्पर्धा २७ ते २९ जानेवारी यादरम्यान होणार आहे. सकाळी ६ ते रात्री १० यावेळेत ४ मॅटवर जवळपास ५०० कुस्त्या पार पडतात. त्यामध्ये एकूण ५० पंच न्यायदानाचे काम करीत आहेत, तर पैलवानांच्या खुराकाची व्यवस्था विद्यापीठातील ४ कॅन्टीनमध्ये करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
24 JAN 2023
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धांत पारंपरिक कुस्तीचाही समावेश व्हावा

## श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, शिवाजी विद्यापीठात अखिल भारतीय कुस्ती स्पर्धांचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धांत मॅटवरील कुस्तीच्या बरोबरीने पारंपरिक मातीतील कुस्तीचाही समावेश करावा, अशी सूचना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी केली. शिवाजी विद्यापीठात सोमवारी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती (पुरुष) स्पर्धांचा उद्‌घाटन समारंभ श्रीमंत शाहू छत्रपती महाराज आणि हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठामध्ये झाला.

श्रीमंत शाहू महाराज म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रोत्साहनामुळेच कुस्तीचा देशभरात प्रसार झाला. तालमीतील सराव, मातीतील कुस्ती आजही या भूमीत जपली जाते; मात्र सध्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मॅटवरील कुस्ती खेळवली जाते आहे. त्याचबरोबर पारंपरिक कुस्ती जपण्याची जबाबदारीही आपण उचलली पाहिजे. त्यासाठी भारतीय विद्यापीठ महासंघाने त्यांच्या क्रीडा कार्यक्रमात पारंपरिक



कोल्हापूर : कुस्ती स्पर्धेचे उद्‌घाटन रोपट्यास पाणी घालून करताना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी.

कुस्तीचा समावेश करावा, यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत.

हिंदकेसरी दीनानाथ सिंह म्हणाले, कुस्तीच्या नभांगणातील सारे तारे जणू काही शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात उतरल्याचा भास होतो आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी श्रीमंत शाहू महाराज यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसादादाखल भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांना पारंपरिक कुस्तीचा एआययूच्या क्रीडा स्पर्धांत समावेश करण्याबाबत विचार करण्याची विनंती केली.

उद्‌घाटन समारंभानंतर विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्राची लोकपरंपरा' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश कांबळे आणि डॉ. अभिजित वणिरे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

24 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## श्रीमंत शाहू छत्रपती महाराज; अखिल भारतीय कुस्ती स्पर्धांना प्रारंभ

# पारंपरिक कुस्तीही विद्यापीठ स्तरावर घ्या

▸सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : बदलत्या काळानुसार मॅटवरील कुस्ती ठीक असले तरी पारंपरिक कुस्ती जपण्याची जबाबदारीही आपण उचलली पाहिजे. त्यासाठी भारतीय विद्यापीठ महासंघाने त्यांच्या क्रीडा कार्यक्रमांसह अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धांतही पारंपरिक कुस्तीचा समावेश करावा. यासाठी विद्यापीठांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. हिंदकेसरी दीनानाथ सिंह प्रमुख उपस्थित होते. श्रीमंत शाहू महाराज म्हणाले, "राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रोत्साहनामुळेच कुस्तीचा देशभरात प्रसार झाला. जागतिक किर्तीचे मल्ल कोल्हापूरच्या मातीमध्ये घडले. देशभरातील मल्लांसाठी ही प्रेरणाभूमी ठरली." हिंदकेसरी दीनानाथ सिंह म्हणाले, "आमचा काळ शाळेऐवजी तालमीत जाण्याचा होता. आता मात्र शिक्षण आणि कुस्ती एकत्रितपणे साध्य होत आहे. त्यामुळे मल्लांनी खेळ आणि जीवन यांची उत्तम सांगड घालून या क्षेत्राची सेवा करावी."

एआययूचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांनी शिवाजी विद्यापीठात सन २००७ मध्ये झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेची आठवण जागविली. पारंपरिक कुस्तीचा एआययूच्या क्रीडा स्पर्धांत समावेश करण्याबाबत विचार करण्याची विनंती कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केली. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश कांबळे आणि डॉ. अभिजीत वणिरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्राची लोकपरंपरा' कार्यक्रम सादर केला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेच्या उद्‌घाटनाप्रसंगी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते नागपूरचा मल्ल साहिल आर. आणि कुरुक्षेत्रचा मल्ल आशिष जगपाल यांच्यात कुस्ती लावण्यात आली. शेजारी शरद बनसोडे, डॉ. दिगंबर शिर्के, दीनानाथसिंह, सुरेशकुमार मलिक आदी.**
**(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)**



**कोल्हापूर : अखिल भारतीय कुस्ती स्पर्धेत सोमवारी ७९ किलो गटात अनमोल ओरॉन (लाल) आणि हरमनजित (निळा) यांच्यातील लढतीचा क्षण.**

### दिग्गजांचा सत्कार

कुस्तीतील दिग्गज विष्णू जोशीलकर, उत्तमराव पाटील, विनोद चौगुले, बाबासाहेब शिरगावकर, रंगराव हर्णे, नामदेव मोळे, चंद्रकांत चव्हाण, अशोक माने, संभाजी वरुटे, राम सारंग, अक्षय डेळेकर, बंकट यादव, नवनाथ ढमाल, रोहिदास कांबळे, संभाजी पाटील, दिलीप पवार यांचा श्रीमंत शाहू महाराजांच्या हस्ते शाल व स्मृतिचिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आला.

### ४६२ लढती रंगल्या

दरम्यान, उद्‌घाटनाच्या कुस्तीत नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा मल्ल साहिल आर. याच्यावर कुरूक्षेत्र विद्यापीठाचा मल्ल आशिष जगपाल याने ९७ किलो वजनी गटात १२-०२ अशी मात केली.न, या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी सोमवारी चार विविध वजनी गटांचे मिळून एकूण ४६२ कुस्त्या रंगल्या. त्यात ६१ किलो गटात १२१, ७० किलो गटात १३३ सामने, ७९ किलो गटात १२० तर ९७ किलो गटात ८८ लढती झाल्या. सकाळी साडेआठपासून सुरू झालेल्या लढती रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या.

24 JAN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठस्तरावर लालमाती कुस्ती स्पर्धा आयोजित करा

## श्रीमंत शाहू छत्रपती : अ. भा. आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेचे श्रीमंत शाहूंच्या हस्ते उद्घाटन: आजी माजी नामवंत मल्लांचा गौरव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराजांनी देशातील मल्लांत लाल मातीतील कुस्ती रुजवली. आता शिवाजी विद्यापीठासह अखिल भारतीयस्तरावरील विद्यापीठांस्तरावर मॅटबरोबरच मातीतील कुस्ती स्पर्धांचे आयोजन होणे आवश्यक आहे, अशी सूचना श्रीमंत शाहू छत्रपती यांनी आज येथे केली.

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सुरु असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल व ग्रीकोरोमन पुरुष कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी श्रीमंत शाहू यांनी स्पर्धेचे उद्घाटन करुन उपस्थित देशभरातील विविध विद्यापीठांमधील मल्लांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रोत्साहनामुळेच कुस्तीचा प्रचार व प्रसार देशात झाला. कोल्हापुरातील लालमातीत तर जागतिक कीर्तीचे मल्ल घडले. कोल्हापुरातील आखाड्यांमध्ये आजही



कोल्हापूर : अ. भा. आंतरविद्यापीठ पुरुष कुस्ती स्पर्धेतील लढत लावताना श्रीमंत शाहू छत्रपती. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, हिंदकेसरी दिनानाथसिंह, डॉ. सुरेशकुमार मलिक, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड आदीसह मान्यवर.

सराव, मातीत केला जात आहे. मात्र सध्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर मॅटवरील कुस्ती लावाल्य जात आहेत. बदलत्या काळानुसार हे ठीक असले तरी पारंपरिक कुस्ती जपण्याची जबाबदारीही आता शिवाजी विद्यापीठानेही उचलण्याची वेळ आली आहे. अखिल भारतीय विद्यापीठ महासंघाने पारंपरिक कुस्तीचा आपल्याकडील क्रीडा प्रकारात समावेश करावा, असेही श्रीमंत शाहूंनी सुचवले.

हिंदकेसरी दीनानाथ सिंह म्हणाले, आता खेळ विद्यार्थ्यांला नोकरीपासून सर्व काही मिळवून देऊ शकतो. त्यामुळे कुस्तीपटूंनी मेहनत आणि जीवन या दोहोंची उत्तम सांगड घालून व कुस्तीची सेवा करावी. एआययूचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांनी शिवाजी विद्यापीठात २००७ साली झालेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेची आठवण सांगितली.

श्रीमंत शाहू छत्रपती यांनी मातीतील कुस्तीसंदर्भात केलेल्या सुचनेचा धागा पकडून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अखिल भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार मलिक यांना पारंपरिक मातीतील कुस्तीचा एआययूच्या क्रीडा स्पर्धांत समावेश करण्याबाबत गांभिर्याने विचार करावा.

यावेळी कुस्तीत नाव कमवलेले हिंदकेसरी विनोद चौगले, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संभाजी पाटील, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, नामदेव मोळे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दिलीप पवार, उत्तमराव पाटील, आंतरराष्ट्रीय मल्ल बाबासाहेब शिरगावकर, 'साई'चे प्रशिक्षक चंद्रकांत चव्हाण, माजी विश्वविद्यापीठ चॅम्पियन संभाजी वरुटे, आंतरराष्ट्रीय मल्ल अक्षय डेळेकर, आंतरराष्ट्रीय पंच बंकट यादव, नवनाथ ढमाल व रोहिदास कांबळे यांच्या हस्ते श्रीमंत शाहू महाराज यांच्यासह कुलगुरू डॉ. शिर्के व दिनानाथसिंह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दरम्यान, उद्घाटन समारंभाची शान वाढण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'महाराष्ट्राची लोकपरंपरा" हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यावेळी डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते. क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अभिजीत वणिरे व डॉ. प्रकाश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.दरम्यान, सोमवारी दिवसभरात फ्रीस्टाईल प्रकारातील ४६२ कुस्ती लावण्यात आल्या. यामध्ये ६१ किलो वजनी गटातील १२१, ७० किलो गटातील १३३, ७९ किलो गटातील १२० आणि ९७ किलो गटातील ८८ कुस्तींचा समावेश आहे.

### शाहू महाराजांच्या हस्ते कुस्तीस प्रारंभ...

स्पर्धेच्या उद्घाटनानंतर श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते मॅटवर कुस्तीही लावण्यात आल्या. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचा मल्ल साहील आर. आणि कुरूक्षेत्र विद्यापीठाचा मल्ल आशिष जगपाल यांच्यात ९७ किलो वजनी गटातील कुस्ती श्रीमंत शाहूंनी लावून ती पाहण्याचा आनंदही लुटला. या कुस्तीत आशिषने साहिलला १२-०२ अशा गुणफरकांनी हरवले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त 'महर्षी शिंदे आणि सर्वसमावेशक भारताची संकल्पना' या विषयावर आज दि. २४ व उद्या २५ जानेवारी रोजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवनात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

या चर्चासत्राचे बीजभाषण ज्येष्ठ विचारवंत प्रा. आ.ह. साळुंखे हे करणार आहेत. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के आहेत, तर प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती आहे. या चर्चासत्रात 'महर्षी शिंदे आणि भारतविषयक संकल्पना- अस्पृश्यता निवारण चळवळ, धर्मचिंतन, शेती प्रश्न आणि चळवळ, राजकारण आणि इतिहासदृष्टी, समाजशास्त्रीय लेखन व स्त्रीविषयक दृष्टिकोन, महर्षी शिंदे यांचे वाङ्मय आणि भारतविषयक संकल्पना' या विषयांवर मांडणी होणार आहे.

ज्येष्ठ विचारवंत प्रा. जयसिंगराव पवार हे समारोपासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. अध्यक्ष शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी.एस. पाटील आहेत.